सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष १, अंक १४ ]  शनिवार, जून २७, २००९/आषाढ ६, शके १९३१  [ पृष्ठे ११, किंमत रुपये १८.००

**असाधारण क्रमांक ३१**

**प्राधिकृत प्रकाशन**


**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.**—महाराष्ट्र राज्यामध्ये अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम . . . . . . | १-११ |


दिनांक २७ जून २००९ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २७ जून २००९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राज्यामध्ये अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या साठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक
## **प्रारंभिक**

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २००९ असे म्हणावे.

(२) (क) कलमे १ ते ४ राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येतील.

(ख) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, उर्वरित कलमे दिनांक १ जुलै २००९ पासून अंमलात येतील.

## प्रकरण दोन
## **मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ याची सुधारणा.**

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६० याच्या अनुसूची एक ची सुधारणा. **२.** मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ याच्या अनुसूची एक मधील,—— १९५८ चा मुंबई ६०.

(क) अनुच्छेद ५ मधील, खंड (ह) मध्ये, उप-खंड (अ) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :——

| | |
|---|---|
| " (अ) जर,——<br>(एक) कोणतेही उत्पादन किंवा कार्यक्रम किंवा सोहळा यांच्यापासून नफा मिळवण्याच्या किंवा व्यवसाय करण्याच्या हेतूने त्यांना चालना देण्यासाठी, प्रसार माध्यमावर केलेली कोणतीही जाहिरात, या संबंधात असेल तर,—— | |
| (अ) संमत करण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांहून अधिक नसेल तर ; | किमान १०० रुपयांच्या अधिनतेने, करारात संमत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन रुपये पन्नास पैसे. |
| (ब) अन्य कोणत्याही बाबतीत | करारात संमत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता पाच रुपये. |

| | |
|---|---|
| (दोन) एखादा सोहळा किंवा एखादा चित्रपट याचे दृकप्रसारण, ध्वनिक्षेपण किंवा प्रदर्शन यांचा संपूर्ण हक्क प्रदान करणे, यासंबंधात असेल तर,— | |
| (अ) संमत करण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांहून अधिक नसेल तर ; | किमान १०० रुपयांच्या अधिनतेने, करारात संमत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन रुपये पन्नास पैसे. |
| (ब) अन्य कोणत्याही बाबतीत | करारात संमत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता पाच रुपये. |
| (तीन) कराराचे मूल्य १,००,००० रुपयांहून अधिक असेल अशा, कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तीच्या गटाने सादर करावयाच्या विशिष्ट कार्यक्रमाच्या संबंधात असेल तर,— | |
| (अ) संमत करण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांहून अधिक नसेल तर ; | किमान १०० रुपयाच्या अधिनतेने, करारात संमत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन रुपये पन्नास पैसे. |
| (ब) अन्य कोणत्याही बाबतीत | करारात संमत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता पाच रुपये. |
| (चार) कोणतेही आबंधन, हक्क किंवा हितसंबंध यांच्या निर्मितीच्या संबंधातील असेल आणि आर्थिक मूल्य असणारे परंतु अन्य कोणत्याही अनुच्छेदाखाली समाविष्ट केलेले नसेल तर,— | |
| (अ) संमत करण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांहून अधिक नसेल तर ; | किमान १०० रुपयांच्या अधीनतेने, करारात संमत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया. |
| (ब) अन्य कोणत्याही बाबतीत | करारात संमत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन रुपये. |

१९५७ चा १४. (पाच) कॉपीराईट अधिनियम, १९५७ अन्वये कॉपीराईटच्या अभिहस्तांकनाच्या संबंधात असेल तर,—

| | |
|---|---|
| (अ) संमत करण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांहून अधिक नसेल तर ; | किमान १०० रुपयांच्या अधीनतेने, करारात संमत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन रुपये पन्नास पैसे. |
| (ब) अन्य कोणत्याही बाबतीत | करारात संमत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता पाच रुपये. |

(सहा) बांधा, वापरा व हस्तांतरित करा पद्धतीखालील प्रकल्प - मग तो पथकर किंवा फी वसूल करण्याचा हक्क यांसह असो किंवा यांव्यतिरिक्त असो,—

| | |
|---|---|
| (अ) संमत करण्यात आलेली रक्कम पाच लाख रुपयांहून अधिक नसेल तर ; | किमान १०० रुपयांच्या अधीनतेने, करारात संमत केलेल्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया. |
| (ब) अन्य कोणत्याही बाबतीत | करारात संमत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन रुपये." ; |

(ख) अनुच्छेद ६ मध्ये,—

(एक) खंड (१) व खंड (२) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येतील:—

" (१) हक्कविलेख किंवा (विक्रेय प्रतिभूतिपत्राखेरीज इतर) कोणत्याही प्रकारच्या मालमत्तेवर हक्क प्रस्थापित करणारा किंवा अशा हक्काचा पुरावा असणारा संलेख जेथे तो कर्जाच्या स्वरूपात दिलेल्या किंवा द्यावयाच्या पैशाच्या अथवा विद्यमान किंवा भावी ऋणाच्या परतफेडीबद्दल प्रतिभूतीच्या स्वरूपात निक्षेपित केलेला असेल त्याबाबतीत असा हक्कविलेख किंवा संलेख निक्षेप म्हणून ठेवणे,—

| | |
|---|---|
| (अ) अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत करण्यात आलेली रक्कम पाच लाख रुपयांहून अधिक नसेल तर ; | अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेसाठी, शंभर रुपयांच्या किमान मर्यादेस अधीन राहून दर एक हजार |

| | |
|---|---|
| | रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया. |
| (ब) अन्य कोणत्याही बाबतीत | अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन रुपये. |
| (२) जंगम मालमत्तेचे हडप, तारण किंवा तारणगहाण, जेथे कर्जाच्या स्वरुपात दिलेल्या किंवा द्यावयाच्या पैशाच्या अथवा विद्यमान किंवा भावी ऋणाच्या परतफेडीबद्दल प्रतिभूतीच्या रुपाने असे हडप, तारण किंवा तारणगहाण करण्यात आले असेल अशा बाबतीत,— | |
| (अ) अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत करण्यात आलेली रक्कम पाच लाख रुपयांहून अधिक नसेल तर; | अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेसाठी, शंभर रुपयांच्या किमान मर्यादेस अधीन राहून दर एक हजार रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया. |
| (ब) अन्य कोणत्याही बाबतीत | अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन रुपये." ; |

(दोन) विद्यमान स्पष्टीकरण दोन वगळण्यात येईल.

## प्रकरण तीन

## मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ याची सुधारणा.

१९५८ चा मुंबई ६५. **३.** मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ याच्या तिसऱ्या अनुसूचीमध्ये, भाग एक मधील स्तंभ (२) मध्ये, "वाहनाच्या किंमतीच्या ७ टक्के" या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल:— सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ याच्या तिसऱ्या अनुसूचीची सुधारणा.

" (क) वाहनाची किंमत रुपये १० लाख पर्यंत असल्यास वाहनाच्या किंमतीच्या ७ टक्के ;

(ख) वाहनाची किंमत रु.१० लाख यापेक्षा अधिक असेल परंतु रु. २० लाख यापेक्षा अधिक होत नसेल तर वाहनाच्या किंमतीच्या ८ टक्के ;

(ग) वाहनाची किंमत रु.२० लाख यापेक्षा अधिक असेल तर वाहनाच्या किंमतीच्या ९ टक्के. " .

प्रकरण चार

## महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ यामध्ये सुधारणा.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या अनुसूची एकची सुधारणा.

१९७५ चा महा. १६.

४. महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ याला जोडलेल्या अनुसूची एक मधील नोंद १ ऐवजी, पुढील नोंद दाखल करण्यात येईल:—

" १. वेतनदार व मजुरी मिळविणारे-

ज्यांचे मासिक वेतन किंवा मजुरी,-

| | |
|---|---|
| (अ) ५,००० रुपयांहून अधिक नाही. | काही नाही. |
| (ब) ५,००० रुपयांहून अधिक परंतु १०,००० रुपयांहून अधिक नाही. | दरमहा रुपये १७५. |
| (क) १०,००० रुपयांहून अधिक. | दरसाल रुपये २,५०० हा कर पुढील रीतीने देण्यात येईल:-<br>(अ) फेब्रुवारी महिना वगळता दरमहा रुपये २०० ;<br>(ब) फेब्रुवारी महिन्यात रुपये ३००.". |

प्रकरण पाच

## महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम,२००२ यामध्ये सुधारणा.

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम २० ची सुधारणा.

२००५ चा महा. ९.

५. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम,२००२ (यात यापुढे या प्रकरणात ज्याचा निर्देश "मूल्यवर्धित कर अधिनियम" असा करण्यात आला आहे ) याच्या कलम २० मधील, पोट-कलम (४) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(४) कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यापाऱ्याने, विवरण किंवा, यथास्थिती, सुधारित विवरण सादर केल्यानंतर,—

(क) त्यात कोणताही मजकूर वगळल्याचे किंवा चुकीचे विधान केले असल्याचे त्यास आढळून आले तर, उक्त विवरणात अंतर्भूत असलेल्या कालावधीच्या संबंधातील निर्धारणाची नोटीस त्याच्यावर बजावण्यात येण्यापूर्वी किंवा ज्या वर्षात उक्त विवरण सादर केले असेल त्या वर्षाच्या समाप्ती पासून नऊ महिन्यांचा कालावधी संपण्यापूर्वी, यांपैकी जे अगोदर घडेल, या कोणत्याही वेळी त्यास विवरण किंवा यथास्थिती, सुधारित विवरण सादर करता येईल;

(ख) कलम ६१ च्या प्रयोजनार्थ करण्यात आलेल्या लेख्याच्या लेखापरीक्षा अहवालाचा परिणाम म्हणून, विवरण सादर केल्यानंतर त्यात कोणताही मजकूर वगळल्याचे किंवा चुकीचे विधान केले असल्याचे, त्यास आढळून आले तर, उक्त

अहवाल सादर करण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापासून तीस दिवसांचा कालावधी संपल्यानंतर, जो कोणताही मजकूर वगळण्यात आला असेल किंवा ज्या मजकुराच्या बाबतीत चुकीचे विधान करण्यात आले असेल त्यासंबंधात सुधारित विवरण सादर करता येईल ;

(ग) त्याने दाखल केलेले विवरण, नवीन विवरण किंवा, यथास्थिति, सुधारित विवरण यांमधील कोणताही मजकूर वगळण्यात आला असल्याबाबत किंवा त्यात चुकीचे विधान केले असल्याबाबत कलम ६३ अन्वये त्याला मिळालेल्या कोणत्याही सूचनेमध्ये अंतर्भूत असलेल्या बाबी त्याला मान्य असतील तर, उक्त विवरणात समाविष्ट केलेल्या कालावधीच्या संबंधात, त्याला उक्त सूचना देण्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, सुधारित विवरण सादर करता येईल.".

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम २९ ची सुधारणा.

६. मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम २९ मधील, पोट-कलम (८) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल:—

"(८) जेथे, कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यापाऱ्याने, विहित कालावधीत, कलम २० अन्वये तरतूद करण्यात आल्याप्रमाणे, कोणत्याही कालावधीचे विवरण दाखल करण्यात कसूर केली असेल तेथे, आयुक्ताला, त्याच्याकडून देय असलेल्या पाच हजार रुपये इतक्या रकमेची शास्ती बसविता येईल. अशा शास्तीमुळे या अधिनियमान्वये त्याच्यावर बसविण्यात येणाऱ्या इतर कोणत्याही शास्तीत बाध येणार नाही.".

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ३० ची सुधारणा.

७. मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम ३० मध्ये, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल:-

" (४) (क) (एक) व्यापाऱ्याच्या व्यवसायाची कोणत्याही कालावधीच्या बाबतीतील लेखापरीक्षा करण्यास, किंवा

(दोन) व्यापाऱ्याच्या व्यवसायाच्या ठिकाणी ठेवलेल्या कोणत्याही कालावधीशी संबंधित असलेल्या लेख्यांची, नोंदवह्यांची व कागदपत्रांची कोणत्याही वेळी तपासणी करण्यास, किंवा

(तीन) व्यवसायाच्या ठिकाणी किंवा ज्या ठिकाणी व्यापाऱ्याने कोणत्याही कालावधीशी संबंधित असलेले लेखे, नोंद वह्या, कागदपत्रे किंवा मालाचा साठा ठेवला असेल अशा कोणत्याही ठिकाणी प्रवेश करण्यास व झडती घेण्यास सुरूवात केल्यावर,

(ख) कलम ६३ च्या पोट-कलम (७) अन्वये देण्यात आलेल्या सूचनेच्या परिणामी, व्यापाऱ्याने एक किंवा त्यापेक्षा अधिक विवरणे किंवा यथास्थिति, उक्त कालावधीच्या बाबतीत सुधारित विवरणे दाखल केल्यास, ते विवरण किंवा यथास्थिति, सुधारित विवरण याअनुसार कोणताही कर देय असल्यास, त्या कराच्या रकमेव्यतिरिक्त, विवरण किंवा, यथास्थिति, सुधारित विवरण याअनुसार देय असलेल्या अतिरिक्त कराच्या २५ टक्क्यांइतकी रक्कम व्याजाच्या रुपाने भरण्यास पात्र असेल.".

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ६३ ची सुधारणा.

**८.** मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम ६३ मधील, पोट-कलम (६) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल:—

"(७) कोणताही व्यापारी किंवा अन्य यांच्या बाबतीतील कोणतीही कार्यवाही करताना, आयुक्तास, व्यापाऱ्याने भरलेल्या विवरणांमध्ये दाखवलेले देय असलेल्या कराची रक्कम किंवा यथास्थिति, वजावट वा परतावा याची रक्कम किंवा, यथास्थिति, त्या व्यापाऱ्याच्या लेखा पुस्तकातील नोंद चुकीची असल्याचे दिसून आले तर, आयुक्तास, अतिरिक्त कराची रक्कम, कोणतीही असल्यास, जी भरावी लागेल किंवा वजावटीच्या अथवा परताव्याच्या रकमेमध्ये घट करणे यांसारख्या गोष्टी अशा व्यापाऱ्याला कळविण्यासाठी, विहित नमुन्यामध्ये माहिती पाठविता येईल आणि त्यास विवरण दाखल करण्याचा किंवा यथास्थिति, माहितीचा आशय लक्षात घेतल्यानंतर सुधारित विवरण दाखल करता येईल.".

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ८५ ची सुधारणा.

**९.** मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम ८५ मध्ये, पोट-कलम (२) मध्ये, खंड (ख-१) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल:—

"(ख-२) कलम २९ च्या पोट-कलम (८) अन्वये लादावयाच्या शास्तीचा आदेश, किंवा ".

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याला जोडलेल्या अनुसूची क ची सुधारणा.

**१०.** मूल्यवर्धित कर अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची क मध्ये, नोंद ५४ नंतर, पुढील नोंदी जादा दाखल करण्यात येतील:—

| | | |
|---|---|---|
| " ५५ | अगरबत्ती, धूप, धूपकांडी किंवा धूपबत्ती या नावाने सर्वसामान्यपणे ओळखल्या जाणाऱ्या सुगंधी कांड्या. | निरंक % |
| ५६ | राज्य शासन, **राजपत्रात**, वेळोवेळी अधिसूचित करील त्याप्रमाणे सौर ऊर्जेची साधने किंवा त्याचे सुटे भाग. | निरंक % ". |

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याला जोडलेल्या अनुसूची ख ची सुधारणा.

**११.** मूल्यवर्धित कर अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची ख मध्ये, नोंद ३ नंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल :—

| | | |
|---|---|---|
| "४. | कृत्रिम दागिने, काचेचे, प्लॅस्टिकचे किंवा मौल्यवान धातूखेरीज अन्य कोणत्याही धातूचे मणी आणि त्यांचे भाग आणि घटक. | १ % ". |

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याला जोडलेल्या अनुसूची ग ची सुधारणा.

**१२.** मूल्यवर्धित कर अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची ग मध्ये,-

(१) नोंद ४१ मधील, स्तंभ (२) मधील, "सर्व स्वरुपाचे आणि वर्णनाचे कर्पूर शिलाजित (जिप्सम)" या मजकुरानंतर, ", जिप्सम बोर्डस वगळून" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल ;

(२) नोंद ५१ ऐवजी, पुढील नोंद दाखल करण्यात येईल :—

" ५१ केसांच्या पिना ४ %";

(३) नोंद ५२ वगळण्यात येईल ;

(४) नोंद ७४ ला, त्याची उप-नोंद (क) असा नवीन क्रमांक देण्यात येईल; आणि नवीन क्रमांक देण्यात आलेल्या उप-नोंद (क) नंतर, पुढील उप-नोंद जादा दाखल करण्यात येईल :—

" (ख) प्लॅस्टिकच्या चटया ४ %" ;

(५) नोंद १०५ मध्ये, स्तंभ (२) मधील, "(अकरा) काचेचे मणी " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(६) नोंद १०८ मध्ये, उप-नोंद (२) मधील, "३१ मार्च २००९" या मजकुराऐवजी, "३१ मार्च २०१०" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो दिनांक १ एप्रिल २००९ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल ;

(७) नोंद १०९ नंतर, पुढील नोंदी जादा दाखल करण्यात येतील :—

| | |
|---|---|
| " ११०. शिकेकाई आणि रिठा अख्खे किंवा भूकटी केलेल्या स्वरूपात. | ४ % |
| १११. कॉम्पॅक्ट फ्लोरोसेन्ट लॅम्प्स. | ४ % |
| ११२. गॅसवर चालणाऱ्या घरगुती वापराच्या शेगड्या ; त्याचे भाग, घटक व उपसाधने. | ४ % |
| १९८६ चा ५. ११३. केंद्रीय अबकारी उत्पादन प्रशुल्क अधिनियम, १९८५ याच्या ८४४५ १९ १० उपशीर्षाद्वारे समाविष्ट करण्यात आलेले कापूस जिनिंग व प्रेसिंग यंत्रसामग्री. | ४ % |
| ११४. कंपोस्टिंग यंत्रसामग्री | ४ %". |

**१३.** मूल्यवर्धित कर अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची घ मध्ये,— सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याला जोडलेल्या अनुसूची घ ची सुधारणा.

(१) नोंद १ मध्ये, स्तंभ (३) मधील, "२० %" या मजकुराऐवजी, "२५ %" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) नोंद २ मध्ये, स्तंभ (३) मधील, "२० %" या मजकुराऐवजी, "२५ %" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) नोंद ३ मध्ये, स्तंभ (३) मधील, "२० %" या मजकुराऐवजी, "२५ %" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(४) नोंद ११ नंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल :—

| | |
|---|---|
| "१२. सिगार आणि सिगारेट यांसह, तंबाखू, उत्पादित तंबाखू आणि त्याची उत्पादने परंतु अनुसूची क ची नोंद ४५क आणि अनुसूची ग ची नोंद १०१ ज्याला लागू होतो तो तंबाखू वगळून, ". | २० %" |

## प्रकरण सहा

## विधिग्राह्यीकरण व व्यावृत्ती

विधिग्राह्यीकरण व व्यावृत्ती.

**१४.** (१) कोणत्याही न्यायालयाचा किंवा न्यायाधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यामध्ये एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र कर विषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम,२००९ (यात यापुढे या प्रकरणात ज्याचा निर्देश " सुधारणा अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (यात यापुढे या प्रकरणात ज्याचा निर्देश "मूल्यवर्धित कर अधिनियम" असा करण्यात आला आहे) यांच्या तरतुदींअन्वये कोणत्याही व्यापाऱ्याने वा व्यक्तीने केलेल्या विक्री किंवा खरेदीबाबत केलेले कराचे कोणतेही निर्धारण, पुनर्विलोकन, आकारणी वा वसुली अथवा असे निर्धारण, पुनर्विलोकन, आकारणी वा वसुली यासंबंधात केलेली कोणतीही कार्यवाही किंवा कृती ही, या सुधारणा अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मूल्यवर्धित कर अधिनियम याअन्वये यथोचितरित्या करण्यात वा हाती घेण्यात आली असल्याप्रमाणे वैध आणि प्रभावी असल्याचे समजण्यात येईल, आणि तदनुसार,—

२००९ चा महा. १७.

२००५ चा महा. ९.

(क) अशा कोणत्याही कराचे निर्धारण, पुनर्विलोकन, आकारणी किंवा वसुली यांच्या संबंधात राज्य शासनाने किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा इतर कोणत्याही प्राधिकाऱ्याने केलेली सर्व कार्ये, कार्यवाही किंवा गोष्टी या, सर्व प्रयोजनांसाठी, कायद्यानुसार करण्यात आल्याचे आणि नेहमीच होत आल्याचे समजण्यात येईल ;

(ख) अशा रीतीने भरण्यात आलेल्या कोणत्याही कराच्या परताव्यासाठी कोणताही दावा, अपील, अर्ज किंवा इतर कार्यवाही कोणत्याही न्यायालयात किंवा कोणतेही न्यायाधिकरण, अधिकारी किंवा इतर प्राधिकारी यांच्यापुढे दाखल करण्यात येणार नाही किंवा चालू ठेवण्यात येणार नाही ; आणि

(ग) कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण, अधिकारी किंवा इतर प्राधिकारी, अशा कोणत्याही कराच्या परताव्याचा निदेश देणारा कोणताही हुकूमनामा किंवा आदेश, अंमलात आणणार नाही.

(२) शंका निरसनासाठी, याद्वारे जाहीर करण्यात येत आहे की, पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे एखाद्या व्यक्तीला,—

(क) सुधारणा अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे असलेला मूल्यवर्धित कर अधिनियम याच्या तरतुदींनुसार पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कराचे निर्धारण, पुनर्विलोकन, आकारणी किंवा वसुली यांच्यासंबंधात हरकत घेण्यास, किंवा

(ख) सुधारणा अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे असलेला मूल्यवर्धित कर अधिनियम याअन्वये कराच्या रूपाने तिच्याकडून येणे असलेल्या रकमेपेक्षा अधिक असणारी, तिने भरलेल्या कोणत्याही कराची रक्कम परत मिळण्याची मागणी करण्यास, प्रतिबंध होतो असा अर्थ लावण्यात येणार नाही.

(३) सुधारणा अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे एखादी व्यक्ती, या सुधारणा अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, तिने केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या

संबंधातील कोणत्याही अपराधाबद्दल, जर अशी कृती किंवा वर्जन हे मूल्यवर्धित कर अधिनियम अन्वये अपराध ठरत नसेल तर, सिद्धपराध ठरवली जाण्यास पात्र असणार नाही, मात्र या सुधारणा अधिनियमाद्वारे करण्यात आलेल्या सुधारणांच्या बाबतीत ही गोष्ट लागू होणार नाही. तसेच कोणतीही व्यक्ती अशी कृती किंवा वर्जन यांच्या संबंधात या सुधारणा अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये तिच्यावर लादण्यात आली असती अशा शास्तीपेक्षा अधिक शास्तीस अधीन असणार नाही.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष १, अंक २५] शनिवार, जून २७, २००९/आषाढ ६, शके १९३१ [ पृष्ठे १२, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक ४९

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Tax Laws (Levy, Amendment and Validation) Act, 2009 (Mah. Act No. XVII of 2009), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT NO. XVII OF 2009.

(First published, after having received the assent of the Governor, in the "*Maharashtra Government Gazette*", on the 27th June 2009).

An Act further to amend certain tax laws in operation in the State of Maharashtra.

WHEREAS it is expedient further to amend certain tax laws in operation in the State of Maharashtra, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Sixtieth Year of the Republic of India as follows :—

## CHAPTER I

### PRELIMINARY

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Maharashtra Tax Laws (Levy, Amendment and Validation) Act, 2009.

(*2*) (*a*) Sections 1 to 4 shall come into force on such date as the State Government may, by notification in the *Official Gazette,* appoint.

(*b*) Save as otherwise provided in this Act, the remaining sections shall come into force with effect from the 1st July 2009.

## CHAPTER II

### AMENDMENTS TO THE BOMBAY STAMP ACT, 1958.

Amendment of SCHEDULE I of Bom. LX of 1958.

**2.** In SCHEDULE I appended to the Bombay Stamp Act, 1958,— Bom. LX of 1958.

(*a*) in article 5, in clause (*h*), for sub-clause (*A*), the following sub-clause shall be substituted, namely :—

"(*A*) If relating to,—

| | |
|---|---|
| (*i*) any advertisement on mass media, made for promotion of any product; or programme or event with an intention to make profits or business out of it,— | |
| (*a*) if the amount agreed does not exceed rupees ten lakhs; | Two rupees and fifty *paise* for every rupees 1,000 or part thereof on the amount agreed in the contract subject to minimum of rupees 100. |
| (*b*) in any other case | Five rupees for every rupees 1,000 or part thereof on the amount agreed in the contract. |

| | |
|---|---|
| (*ii*) conferring exclusive rights of telecasting, broadcasting or exhibition of an event or a film,— | |
| (*a*) if the amount agreed does not exceed rupees ten lakhs; | Two rupees and fifty *paise* for every rupees 1,000 or part thereof on the amount agreed in the contract subject to minimum of rupees 100. |
| (*b*) in any other case | Five rupees for every rupees 1,000 or part thereof on the amount agreed in the contract. |
| (*iii*) specific performance by any person or a group of persons where the value of contract exceed rupees 1,00,000,— | |
| (*a*) if the amount agreed does not exceed rupees ten lakhs; | Two rupees and fifty *paise* for every rupees 1,000 or part thereof on the amount agreed in the contract subject to minimum of rupees 100. |
| (*b*) in any other case | Five rupees for every rupees 1,000 or part thereof on the amount agreed in the contract. |
| (*iv*) creation of any obligation, right or interest and having monetary value, but not covered under any other article,— | |

| | |
|---|---|
| (*a*) if the amount agreed does not exceed rupees ten lakhs; | One rupee for every rupees 1,000 or part thereof on the amount agreed in the contract subject to minimum of rupees 100. |
| (*b*) in any other case | Two rupees for every rupees 1,000 or part thereof on the amount agreed in the contract. |

14 of 1957. (*v*) assignment of copyright under the Copyright Act, 1957,–

| | |
|---|---|
| (*a*) if the amount agreed does not exceed rupees ten lakhs; | Two rupees and fifty *paise* for every rupees 1,000 or part thereof on the amount agreed in the contract subject to minimum of rupees 100. |
| (*b*) in any other case | Five rupees for every rupees 1,000 or part thereof on the amount agreed in the contract. |

(*vi*) project under Built, Operate and Transfer (BOT) system, whether with or without toll or fee collection rights,—

| | |
|---|---|
| (*a*) if the amount agreed does not exceed rupees five lakhs; | One rupee for every rupees 1,000 or part thereof on the amount agreed in the contract subject to minimum of rupees 100. |
| (*b*) in any other case | Two rupees for every rupees 1,000 or part thereof on the amount agreed in the contract."; |

(*b*) in article 6,—

(*i*) for clauses (*1*) and (*2*), the following clauses shall be substituted, namely :—

| | |
|---|---|
| "(1) The deposit of the title deeds or instrument constituting or being evidence of the title to any property whatever (other than a marketable security), where such deposit has been made by way of security for the repayment of money advanced or to be advanced by way of loan or an existing or future debt,— | |
| (a) if the amount secured by such deed does not exceed rupees five lakhs; | One rupee for every one thousand or part thereof for the amount secured by such deed subject to the minimum of one hundred rupees. |
| (b) in any other case | Two rupees for every rupees 1,000 or part thereof for the amount secured by such deed. |
| (2) The pawn, pledge or hypothecation of movable property, where such pawn, pledge or hypothecation has been made by way of security for their repayment of money advanced or to be advanced by way of loan or an existing or future debt,— | |
| (a) if the amount secured by such deed does not exceed rupees five lakhs; | One rupee for every one thousand or part thereof for the amount secured by such deed subject to the minimum of one hundred rupees. |
| (b) in any other case | Two rupees for every rupees 1,000 or part thereof for the amount secured by such deed."; |

(ii) the existing *Explanation II* shall be deleted.

## CHAPTER III

### AMENDMENTS TO THE BOMBAY MOTOR VEHICLES TAX ACT, 1958.

Amendment of THIRD SCHEDULE to Bom. LXV of 1958.

**3.** In the THIRD SCHEDULE to the Bombay Motor Vehicles Tax Act, 1958, in Part I, in column (2), for the figure, sign and words "7% of the cost of vehicle", the following figures and words shall be substituted, namely :— Bom. LXV of 1958.

"(*a*) 7 per cent. of the cost of vehicle, if the cost of the vehicle is upto Rs. 10 lakhs;

(*b*) 8 per cent. of the cost of vehicle, if the cost of the vehicle exceeds Rs. 10 lakhs but does not exceed Rs. 20 lakhs;

(*c*) 9 per cent. of the cost of vehicle, if the cost of the vehicle exceeds Rs. 20 lakhs.".

## CHAPTER IV

### AMENDMENTS TO THE MAHARASHTRA STATE TAX ON PROFESSIONS, TRADES, CALLINGS AND EMPLOYMENTS ACT, 1975.

Amendment to SCHEDULE I of Mah. XVI of 1975.

**4.** In SCHEDULE I appended to the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975, for entry 1, the following entry shall be substituted, namely :— Mah. XVI of 1975.

"1 Salary and wage earners—
Such persons whose monthly salaries or wages,—

| | |
|---|---|
| (*a*) do not exceed rupees 5,000 | Nil. |
| (*b*) exceed rupees 5,000 but do not exceed rupees 10,000 | 175 per month. |
| (*c*) exceeds rupees 10,000 | 2,500 per annum, to be paid in the following manner :—<br>(*a*) rupees two hundred per month except for the month of February ;<br>(*b*) rupees three hundred for the month of February.". |

## CHAPTER V

### AMENDMENTS TO THE MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002.

Mah. IX of 2005. **5.** In section 20 of the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (hereinafter, in this Chapter, referred to as "the Value Added Tax Act "), for sub-section (*4*), the following sub-section shall be substituted, namely :— Amendment of section 20 of Mah. IX of 2005.

"(*4*) Any person or dealer who, having furnished a return or, as the case may be, a revised return,—

(*a*) discovers any omission or incorrect statement therein, may furnish, a revised return in respect of the period covered by the return at any time before a notice for assessment is served on him in respect of the period covered by the said return or before the expiry of a period of nine months from the end of the year to which the return or, as the case may be, the revised return relates, whichever is earlier ;

(*b*) discovers as a result of the report of audit of his accounts prepared for the purpose of section 61, any omission or incorrect statement therein, may furnish a revised return as regards the period in respect of which the omission or incorrect statement is discovered, after the expiry of the period of thirty days from the date prescribed for furnishing the said report ;

(*c*) agrees with the observation contained in any intimation received by him under section 63, that the return, fresh return or, as the case may be, revised return, filed by him contains any omission or incorrect statement, may furnish a revised return in respect of the period covered by the said return within thirty days from the date of service on him of the said intimation.".

**6.** In section 29 of the Value Added Tax Act, for sub-section (*8*), the following sub-section shall be substituted, namely :— Amendment of section 29 of Mah. IX of 2005.

"(*8*) Where, any person or dealer has failed to file within the prescribed time, a return for any period as provided in section 20, the Commissioner shall impose on him, a sum of rupees five thousand by way of penalty. Such penalty shall be without prejudice to any other penalty which may be imposed under this Act.".

Amendment of section 30 of Mah. IX of 2005.

7. In section 30 of the Value Added Tax Act, after sub-section (*3*), the following sub-section shall be added, namely :—

"(*4*) If,—

(*a*) after the commencement of,—

(*i*) audit of the business of the dealer in respect of any period, or

(*ii*) inspection of the accounts, registers and documents pertaining to any period, kept at any place of business of the dealer, or

(*iii*) entry and search of any place of business or any other place where the dealer has kept his accounts, registers, documents pertaining to any period or stock of goods,

(*b*) in consequence of any intimation issued under sub-section (*7*) of section 63,

the dealer files one or more returns or, as the case may be, revised returns in respect of the said period, then he shall be liable to pay by way of interest, in addition to the amount of tax, if any, payable as per the return or, as the case may be, revised return, a sum equal to 25 per cent. of the additional tax payable as per the return or, as the case may be, revised return.".

Amendment of section 63 of Mah. IX of 2005.

8. In section 63 of the Value Added Tax Act, after sub-section (*6*), the following sub-section shall be added, namely: —

"(*7*) If during the course of any proceeding in the case of any dealer or otherwise, it appears to the Commissioner that the quantum of tax payable or, as the case may be, the amount of set-off or refund as disclosed in the returns filed by the dealer or, as the case may be, recorded in the books of accounts of that dealer is incorrect, then the Commissioner may send an intimation in the prescribed Form to such dealer communicating the likely additional quantum of tax, if any, which should have been paid, or the likely reduction in the quantum of set-off or refund and may advise him to file a return or, as the case may be, revised return after taking into account the contents of the intimation.".

**9.** In section 85 of the Value Added Tax Act, in sub-section (2), after clause (*b-1*), the following clause shall be inserted, namely :— Amendment of section 85 of Mah. IX of 2005.

"(*b-2*) an order levying penalty under sub-section (*8*) of section 29, or".

**10.** In SCHEDULE A appended to the Value Added Tax Act, after entry 54, the following entries shall be added, namely :— Amendment of SCHEDULE A appended to Mah. IX of 2005.

| | | |
|---|---|---|
| "55 | Incense sticks commonly known as, *agarbatti, dhoop, dhupkadi* or *dhupbatti*. | Nil% |
| 56 | Solar energy devices as may be notified, from time to time, by State Government in the *Offical Gazette*, and spare parts thereof. | Nil%.". |

**11.** In SCHEDULE B appended to the Value Added Tax Act, after entry 3, the following entry shall be added, namely:— Amendment of SCHEDULE B appended to Mah. IX of 2005.

| | | |
|---|---|---|
| "4 | Imitation Jewellery, beads of glass, plastics or of any metal other than precious metals and parts and components thereof. | 1%.". |

**12.** In SCHEDULE C appended to the Value Added Tax Act,— Amendment of SCHEDULE C appended to Mah. IX of 2005.

(*1*) in entry 41, in column (2), after the words "Gypsum of all forms and description" the words " excluding gypsum boards" shall be added;

(*2*) for entry 51, the following entry shall be substituted, namely:—

"51 Hair pins. 4%.";

(*3*) entry 52 shall be deleted;

(*4*) entry 74 shall be re-numbered as sub-entry (*a*) thereof ; and after sub-entry (*a*) as so re-numbered, the following sub-entry shall be added, namely:—

"(*b*) Plastic mats (*Chatai*) 4%.";

*(5)* in entry 105, in column (2), the brackets, letters and words " (*xi*) glass beads;" shall be deleted;

*(6)* in entry 108, in sub-entry (2), for the figures, letters and word " 31st March 2009" the figures, letters and word "31st March 2010" shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 1st April 2009;

(7) after entry 109, the following entries shall be added, namely:—

| | | |
|---|---|---|
| "110 | Clearing nuts (*Shikekai*) and Soap nuts (*Ritha*) in whole or powder form. | 4 % |
| 111 | Compact Fluorescent Lamps. | 4 % |
| 112 | LPG Stoves for domestic use ; parts, components and accessories thereof. | 4 % |
| 113 | Cotton ginning and pressing machinery covered by sub-heading 8445 19 10 of the Central Excise Tariff Act, 1985. | 4 % |
| 114 | Composting Machinery. | 4 %". |

Amendment of SCHEDULE D appended to Mah. IX of 2005.

**13.** In SCHEDULE D appended to the Value Added Tax Act,—

(*1*) in entry 1, in column (3), for the figures and sign "20%" the figures and sign "25%" shall be substituted;

(*2*) in entry 2, in column (3), for the figures and sign "20%" the figures and sign "25%" shall be substituted;

(*3*) in entry 3, in column (3), for the figures and sign "20%" the figures and sign "25%" shall be substituted;

(*4*) after entry 11, the following entry shall be added, namely:—

| | | |
|---|---|---|
| "12 | Tobacco, manufactured tobacco and products thereof including cigar and cigaretes but excluding those to which entry 45A of SCHEDULE A and entry 101 of SCHEDULE C applies. | 20%.". |

## CHAPTER VI

### VALIDATION AND SAVINGS

**14.** *(1)* Notwithstanding anything contained in any judgement, decree or order of any Court or Tribunal to the contrary, any assessment, review, levy or collection of tax in respect of sales or purchases effected by any dealer or person, or any action taken or thing done in relation to such assessment, review, levy or collection under the provisions of the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (hereinafter, in this Chapter, referred to as "the Value Added Tax Act"), before the date of the commencement of the Maharashtra Tax Laws (Levy, Amendment and Validation) Act, 2009 (hereinafter, in this Chapter, referred to as "the Amendment Act"), shall be deemed to be valid and effective as if such assessment, review, levy or collection or action or thing had been duly made, taken or done under the Value Added Tax Act, as amended by the Amendment Act, and accordingly,— Validation and savings. Mah. IX of 2005. Mah. XVII of 2009.

(*a*) all acts, proceedings or thing done or taken by the State Government or by any officer of the State Government or by any other authority in connection with the assessment, review, levy or collection of any such tax, shall, for all purposes, be deemed to be, and to have always been done or taken in accordance with the law;

(*b*) no suit, appeal, application or other proceedings shall lie or be maintained or continued in any Court or before any Tribunal, officer or other authority, for the refund of any tax so paid; and

(*c*) no Court, Tribunal, officer or other authority shall enforce any decree or order directing the refund of any such tax.

(*2*) For the removal of doubts, it is hereby declared that nothing in sub-section (*1*) shall be construed as preventing a person,—

(*a*) from questioning in accordance with the provisions of the Value Added Tax Act, as amended by the Amendment Act, any assessment, review, levy or collection of tax referred to in sub-section (*1*), or

(*b*) from claiming refund of any tax paid by him in excess of the amount due from him by way of tax under the Value Added Tax Act, as amended by the Amendment Act.

(*3*) Nothing in the Value Added Tax Act, as amended by the Amendment Act, shall render any person liable to be convicted of any offence in respect of anything done or omitted to be done by him, before the commencement of the Amendment Act, if such act or omission was not an offence under the Value Added Tax Act but for the amendments made by the Amendment Act; nor shall any person in respect of such act or omission be subject to a penalty have greater than that which could have been imposed on him under the law in force immediately before the commencement of the Amendment Act.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.